
Lend A Hand India

# कृतीशील संवाद

Lend-A-Hand India

शैक्षणिक वर्ष २०२१ -२२ वर्ष ८ वे अंक ३ : ऑगस्ट २०२१

## जागतिक युवा कौशल्य दिन सर्वत्र उत्साहात साजरा




**संयुक्त** राष्ट्राच्या आमसभेने नोव्हेंबर २०१४ मध्ये १५ जुलै हा दिवस 'जागतिक युवा कौशल्य दिन'(WYSD) म्हणून घोषित केला तेंव्हापासून जगभरात १५ जुलै हा जागतिक युवा कौशल्य दिवस साजरा केला जातो. तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण तसेच प्रशिक्षण (TVET) याबद्दल जाणिव जागृती निर्माण करणे हा मुख्य उद्देश यामागे आहे. भारतातही १५ जुलै २०१५ पासुन राष्ट्रीय कौशल्य विकास मिशन (NSDM) सुरू केले गेले. MSDE ने ही देशभरात जागतिक युवा कौशल्य दिन (१५ जुलै २०२१) साजरा करण्यात पुढाकार घेतला व "Skills for a resilient Youth" या संकल्पनेखाली ' जागतिक युवा कौशल्य दिन" सर्वत्र साजरा करण्यात आला.

देशातील युवा वर्गाला अर्थार्जनाला उपयुक्त अशी कौशल्ये देऊन सक्षम करणे आणि त्यांच्या कामाच्या ठिकाणची त्यांची उत्पादकता अधिक वाढविणे हा MSDE चा मूळ हेतू आहे. MSDE तर्फे, कौशल्य भारत अंतर्गत, बहुविध कौशल्य अभ्यासक्रम शिकविले जातात. हे अभ्यासक्रम जागतिक उद्योगविश्वाची मानके तसेच राष्ट्रीय कौशल्य पात्रता संरचना अंतर्गत सरकारने ठरवलेली मानके या दोन्हीशी सुसंगत असे आहेत.

लेंड अ हॅंड इंडिया सुद्धा कौशल्य शिक्षणाचे महत्व आणि गरज हे सर्वांना कळावे तसेच कौशल्य शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार व्हावा या उद्देशाने कौशल्य शिक्षण अभ्यासक्रम राबवणाऱ्या अनेक शाळांमध्ये **उर्वरित लेख पान क्रमांक दोन वर....**

## या अंकात वाचा ...

**विशेष लेख:** जागतिक युवा कौशल्य दिवस

**MSFC शाळावृत्त**

- प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे online teaching and learning प्रशिक्षण,
- विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन उपक्रम
- गुजरात मधील शाळेतील विद्यार्थी गिरवताहेत गावातच मल्टी स्कीलचे धडे
- **आगामी वार्ता**
- **लेंड अ हॅंड इंडिया अपडेट्स**
- **'कारीगर' - कौशल्य प्रशिक्षण केंद्र : भाग तीन**
- **छायाचित्र गॅलरी:** WYSD

## पान एक वरून पुढे ...जागतिक युवा कौशल्य दिन विशेष

गेली पाच वर्षे योग्य 'जागतिक युवा कौशल्य दिवस' साजरा करट आहे. या वर्षी सुद्धा, करोना संधर्भात खबरदारी घेत, युवा कौशल्य दिवस, ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने साजरा केला. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांसमवेत निदेशक, पालक, शिक्षक आणि मुख्याध्यापक सामील झाले होते. दरवर्षी प्रमाणे विद्यार्थी आणि निदेशक यांच्यासाठी विविध कृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते यामधे कौशल्य विकास आणि शिक्षण यावर तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन तसेच प्रशिक्षणाचे महत्त्व पटवून दिले गेले. विविध कौशल्ये कशी विकसित करावीत, नोकरी किंवा स्वतचा व्यवसाय करण्यासाठी कोणत्या कलागुणांची जोपासना करावी याबाबतची सत्रे यात आयोजित केली होते. अनेक शाळांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी निबंध, चित्रकला, पोस्टर्स, मेसेजेस, (घोषवाक्य/संदेश), विविध ऑनलाईन स्पर्धा आयोजित केल्या होत्या. आजचा युवक उद्याचा उद्योजक, व्यवसाय शिक्षण काळजी गरज - यावर मुला-मुलींचे वक्तृत्व आणि निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. त्याचप्रमाणे मल्टी स्कील उपक्रम पूरक विविध प्रात्यक्षिके विद्यार्थांनी घरगुती पातळीवर केली, उदा. कुंडीमध्ये रोपांची लागवड, टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू तयार करणे, विविध पदार्थ तयार करणे, इत्यादी.

### 'जागतिक युवा कौशल्य दिन' क्षणचित्रे














## एस.के.उनवणे शाळेतील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे 'Online teaching and learning' विषयी प्रशिक्षण संपन्न

**मागील** दिड वर्षांपासून कोविडजन्य परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे आणि शिक्षकांनी शिकविणे या पद्धतींमध्ये खूप वेगवेगळया स्वरूपाचे बदल झालेले आहेत. अनेक शाळा आपापल्या परीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करत आहेत मात्र यामध्ये देखील अनेक अडचणींचा सामना विद्यार्थी आणि शिक्षक यांना करावा लागतो आहे. कोविड आजारामुळे आलेल्या परिस्थितीने ऑनलाईन शिक्षण आणि त्यासाठीची नवीन अध्यापन पद्धतीची गरज प्रकर्षाने अधोरेखित केली आहे.

या गरजेला अनुसरून लेंड अ हॅंड इंडिया संस्थेकडून 'ऑनलाईन अध्यापन तंत्र' प्रशिक्षण कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. मागील एक वर्षात अनेक शाळांतील निदेशकांनी हे ऑनलाईन प्रशिक्षण पूर्ण केले असून त्याद्वारे विद्यार्थ्यांना शिकवण्यास सुरुवात देखील केली आहे.

या वर्षी सुद्धा शालेय वर्षाच्या सुरुवातीस लेंड अ हॅंड इंडिया तर्फे online teaching techniques बद्दल निदेशकांचे प्रशिक्षण आयोजित केले गेले होते. यावरून सावळज शाळेच्या मुख्याध्यापकांना प्रशिक्षणाची रूपरेषा समजली व त्यांनी शाळेतील इतर शिक्षकांसाठी सुद्धा हे प्रशिक्षण गरजेचे वाटल्यामुळे सर्व शिक्षकांसाठी दोन दिवसांचे प्रशिक्षण (जुलै १६ व १७ २०२१) आयोजित केले. यामध्ये एकुण १५ शिक्षकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. या दोन दिवसीय ऑनलाईन प्रशिक्षणामध्ये Online Teaching Methodology -ऑनलाईन शिक्षण पद्धती - ऑनलाईन शिक्षणाच्या विविध पद्धती आणि




त्याचा प्रत्यक्ष विषय शिकविताना प्रभावी वापर. Online Teaching, Effectiveness of Digital Learning Tools and Approach - डिजिटल शिक्षणाची प्रभावी साधने , डिजिटल शिक्षणाचा प्रभावी उपयोग, डिजिटल साधने आणि तंत्रज्ञान, उदा. जी मेल, गुगल वर्कस्पेस, गुगल डॉक, गुगल वर्कशीट, गुगल मिट चा वापर , गुगल फॉर्म तयार करणे आणि त्याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सुलभतेने वापर करणे तसेच प्लॅनिंग, टीचिंग आणि मुल्यांकन करताना डिजिटल साधनाचा सुसंगत आणि सुयोग्य वापर इत्यादी विषयांवर सत्रे घेण्यात आली. वर नमूद केलेल्या विषयांचे मार्गदर्शन लेंड अ हॅंड इंडियाच्या प्रशिक्षण विभागाच्या सहकारी आयशी शर्मा व अंजली पांडे यांनी केले.दोन दिवसाच्या प्रशिक्षणाच्या समन्वयाचे काम अमिल पांडे व पल्लवी कोष्टी यांनी केले. प्रशिक्षणावरील निवडक अभिप्राय खाली दिले आहेत.

सदर दोन दिवसीय ऑनलाईन अध्यापन तंत्र हे प्रशिक्षण आमच्या सर्व शिक्षकांना ऑनलाईन व ऑफलाइन शिक्षण देत असताना अतिशय उपयुक्त ठरणार आहे. प्रशिक्षणामध्ये अध्यापनातील विविध पद्धतीं व डिजिटल माध्यमे याचा वापर निश्चितपणे सर्व शिक्षक करतील हे प्रशिक्षण शैक्षणीक मुल्ये जतन करून भविष्य काळासाठी मार्गदर्शक आणि फायदेशीर असे प्रशिक्षण होते. यामुळे विद्यार्थ्यांना शिकवणे अधिक सुलभ होईल असा विश्वास वाटतो. लेंड अ हॅंड इंडिया संस्थेचे आभार.

**श्री आनंदा पाटील ( मुख्याध्यापक )**
**एस.के.उनवणे स्कुल , सावळज**


या प्रशिक्षणाद्वारे ऑनलाईन शिक्षण पद्धती काय आहे, विद्यार्थांची अध्ययन क्षमता कशी वाढविता येईल, Activity based शिक्षण पद्धतीचा वापर कसा करावा, विद्यार्थ्याचा शिक्षणात सहभाग कसा वाढवता येईल याबबत माहिती दिली गेली. तसेच विविध डिजिटल साधनांचा वापर कसा करता येईल या बाबत आमच्या शाळेतील शिक्षकांना लेंड अ हॅंड इंडिया संस्थेच्या ट्रेनिंग टीमने अतिशय उत्तम मार्गदर्शन केले. त्यामुळे आमच्या शिक्षकांच्या मनातील न्यूनगंड, प्रश्न, अडचणी यांचे सखोल पद्धतीने शंका निरसन केले. सदर प्रशिक्षण विध्यार्थी केंद्रित असून प्रशिक्षणामध्ये शिकायला मिळालेल्या विविध अध्यापनातील पद्धतीचा वापर आमचे शिक्षक विद्यार्थ्यांना शिकविताना नक्की करतील. याकरिता प्रशिक्षण देणाऱ्या ट्रेनिंग टीमचे व सर्व सहकारी यांचे आभार. तसेच शाळेने मागणी केलेल्या विनंतीस सहमती दर्शवून प्रशिक्षण दिल्या बद्दल लेंड अ हॅंड इंडिया संस्थेचे पदाधिकारी यांचे देखील मनपूर्वक आभार.

**श्री. नंदकुमार शेटे (सावळज शिक्षण संस्थेचे पदाधिकारी)**

# MSFC शाळावृत्त

Lend A Hand India

## मुंबई विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन उपक्रम




**मल्टिस्कील** व रिटेल विषय घेउन १०वी पास झाल्यानंतर पुढे काय करावे या संदर्भात सर्व विध्यार्थ्यांच्या मनात संभ्रम असतो. तसेच नक्की कोणता कोर्स करावा, कोणत्या कोर्सला ऑडमिशन घ्यावी, कोणते करियर निवडावे, यासारखे अनेक प्रश्न विघ्यार्थांच्या व पालकांच्या मनात येत असताता. या करिता त्यांच्या मनातील हे संभ्रम दुर करण्यासाठी मुंबई च्या बृहन मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांनसाठी दिनांक २० जूलै २०२१ रोजी करियर गायडन्स सत्र आयोजीत करण्यात आले होते. यामधे ९० हून अधीक विद्यार्थी व पालक उपस्थिती होते. या सत्रा करिता प्रमूख वक्ता म्हणून डॉन बॉस्को I.T.I कॉलेजचे प्राध्यापक श्री. अमर प्रभू यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना १० वी नंतर प्रवेश घेता येणाऱ्या सर्व क्षेत्रांची योग्य प्रकारे माहिती दिली. तसेच सरकारी, खाजगी क्षेत्रातील नोकरीच्या संधी तसेच परदेशातील नोकरीच्या संधी व त्यासाठी आवश्यक शिक्षण या संदर्भात योग्या प्रकारे मार्गदर्शन करण्यात आले.

## कच्छ, गुजरात येथील बी. के. भेदा शाळेतील विद्यार्थ्यांचे गाव पातळीवर वर्ग घेऊन मल्टी स्कील अध्यापन



**कोविड** परिस्थितीत सध्या सर्वत्र online वर्ग सुरु आहेत. मात्र जे विद्यार्थी दुर्गम भागात राहतात आणि विविध कारणांमुळे ऑनलाईन वर्गासाठी उपस्थिती राहू शकत नाहीत अशा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होताना दिसतो आहे. गुजरात मधील प्रकल्प स्वाधीन मधील लेंड अ हॅण्ड इंडियाच्या निदेशकांनी मात्र या अडचणीवर मात करून योग्य कृती केली आहे. जे विद्यार्थि दुर्गम आणि ग्रामीण भागात राहतात अशा विद्यार्थांसाठी निदेशक प्रत्यक्ष त्या गावात जाऊन योग्य त्या सुरक्षा नियमांचे पालन करून, गाव पातळीवर वर्ग घेऊन विद्यार्थांना मल्टी स्कील विषयाचे अध्यापन करीत आहेत. निदेशकांद्वारे करण्यात आलेल्या या प्रयत्नांमुळे या करोनाजन्य परिस्थिती मद्ये विद्यार्थांना अध्ययनाची संधी मिळत आहे.

# निदेशक विशेष

## ‘औषधी वनस्पती आणि रानभाज्यांचा अभ्यास आणि लागवड’ : ज्ञानगंगा विद्यालयाचा पर्यावरण पूरक उपक्रम

ज्ञानगंगा विद्यानिकेतन, मांचीहील विद्यालयामध्ये मल्टी स्कील उपक्रमाच्या माध्यमातून वेगवेगळे प्रकल्प राबवले जातात.त्यापैकी विद्यालयातील गृह आरोग्य विभागाच्या निदेशिका सौ. जयश्री जोंधळे मॅडम यांनी औषधी वनस्पती आणि रानभाज्यांच्या यांचा अभ्यास आणि लागवड असा पर्यावरण पूरक उपक्रम विद्यालयातील मल्टी स्कील विद्यार्थ्यासाठी राबविला.




विद्यालय, गाव आणि शेताच्या अवतीभवती असलेला निसर्गरम्य परिसर नेहमीच मुलांना आकर्षित करतो. परंतु गेल्या वर्षापासून कारोनाजन्य परीस्थिती मुळे विद्यार्थ्यांचा बाहेरील वाव बंद झाला. विद्यार्थ्यांचे घरात ऑनलाईन पद्धतीने शिक्षण सुरु झाले. घरात बसून विद्यार्थी कंटाळतात आणि त्याचा त्यांच्या अध्यायनावर परिणाम होत असल्याचे निदेशकांना निदर्शनास आले. याच पार्श्वभूमीचा आधार घेत विद्यार्थ्यांना थोडे निसर्गाशी जोडून शिक्षण व्हावे या हेतूने हा उपक्रम सौ. जोंधळे जयश्री मॅडमने राबवला. या उपक्रमामागे कौशल्य अभ्यासक्रमाच्या हाताने काम करत शिकण्याच्या पद्धतीचे पाया आहे.

पावसाळा सुरु झाला की खेड्यापाड्यात, माळरानात, वाडी वस्तीवर, रस्तेच्या कडेला, कुंपणात गवत आणि आणि आपल्याला माहिती नसणाऱ्या असंख्य रानभाज्या उगवलेल्या दिसतात. जसे ऋतूमानाप्रमाणे फळे ही शरीराला पोषकद्रव्ये पुरवतात तसे ऋतूप्रमाणे मिळणाऱ्या पालेभाज्याही सकस असतात. साधारण ३००० प्रकारच्या रानभाज्या पावसाळ्यात खाण्यायोग्य मिळू शकतात तसेच विविध प्रकारच्या औषधी वनस्पती देखील उगवतात. माहिती अभावी आजही अनेक भाज्या आणि औषधी वनस्पती आपण ओळखू शकत नाही. त्याचा उपयोग, फायदे,महत्व याची आपल्याला माहिती नसते. त्या संदर्भात हा उपक्रम राबवण्यात आला. लुप्त होत चाललेल्या रानभाज्या पुन्हा आहारात कशा आणता येतील या रानभाज्या कशा ओळखाव्या, त्यामधे कोणती घटकद्रव्ये असतात, कोणकोणती पोषक घटक याच्या माध्यमातून मिळतात या संदर्भातील व्हिडीओ मुलांना दाखवण्यात आले. फोटो आणि व्हिडिओ मुळे मुलांना नवनवीन पालेभाज्या माहिती झाल्या व त्याप्रमाणे आपल्या अवतभोवती परिसरात असणाऱ्या रानभाज्या आणि वन औषधी याची पाहणी करून माहिती संकलित करण्याचे गृहकार्य विद्यार्थांना देण्यात आले. यात गोखरू, केना, माठ, तांदुळजा, आबाडा, यासारख्या रानभाज्या तर माकडशिंदड, रक्तचंदन, गुळवेल, अडुळसा, जेष्ठमध, कोरफड यासारख्या औषधी वनस्पतीची माहिती झाली. आजी-आजोंबाच्या मदतीने विद्यार्थि औषधी वनस्पती, रानभाज्या, ओळखायला शिकले यामुळे पहिल्या पिढीतून विचारांची देवाणघेवाण तिसऱ्या पिढीकडे होण्यास मदत झाली. रानभाज्या आणि औषधी वनस्पती कशा ओळखायच्या, त्याचा उपयोग कशासाठी करतात ही माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.

विद्यार्थ्यांनी औषधी वनस्पतींची लागवड घरातील परसबागेत केली आहे आणि त्याचे संगोपन विद्यार्थी आवडीने करीत आहेत. अश्या प्रकारे या आगळया वेगळया उपक्रमामुळे विद्यार्थांचे निसर्गाशी नाते जोडून राहण्यास मदत होत आहे.

# आगामी वार्ता

**विद्यार्थि वैयक्तिक,कौटुंबिक आणि शैक्षणिक माहिती संकलन**

दरवर्षी लाही कडून शैक्षणिक वर्षाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती मागवली जाते. मागील अनेक वर्ष सदर माहिती ही शाळांकडे फॉर्मचा नमुना पाठवून शाळा त्यांच्या प्रति काढून विद्यार्थ्यांकडून भरून घेत व लाही कार्यालयास पाठवत असत. यावर्षी मात्र त्याच्या स्वरूपामध्ये बदल केला गेला. सन २०२०-२१ साठी सदर माहिती ऑनलाईन पद्धतीने संकलीत केली जात आहे. त्यामुळे शाळांचा, निदेशकांचा व संस्थेचा देखील वेळ वाचत आहे. शाळांना सदर फॉर्म पाठवण्याची प्रकिया पूर्ण झाली असून विद्यार्थी ते भरून पुन्हा ऑनलाईन पद्धतीने संस्थेकडे पाठवण्याची प्रक्रिया सुरु आहे. ती सदर महिन्यात पूर्ण होईल.

**लाही बिनव्याजी शिष्यवृत्ती**

नेहमीप्रमाणे यावर्षी दहावी पास झालेल्या विद्यार्थ्यांसाठी लेंड अ हँड इंडिया बिनव्याजी शिष्यवृत्ती योजने अंतर्गत शिष्यवृती अर्ज लवकरच शाळांना पाठवण्यात येतील. प्रामुख्याने तांत्रिक विषयांत पुढील शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांचा या शिष्यवृत्ती करिता विचार केला जातो.

# लेंड अ हँड इंडिया अपडेट्स

- **CBSE शिक्षकांसाठी मल्टी स्कील विषय प्रशिक्षण**

जुलै महिन्यामध्ये लेंड अ हॅन्ड इंडिया तर्फे सेन्ट्रल बोर्ड ऑफ सेकण्डरी एज्युकेशन (CBSE) शिक्षकांसाठी मल्टी स्कील विषयाचे, जो आता सर्व CBSE शाळांमध्ये उपलब्ध आहे, प्रशिक्षण घेण्यात आले. ६०० पेक्षा अधिक सीबीएसई (CBSE) शिक्षकानी 'मल्टी स्किल फाउंडेशन कोर्स'(MSFC) विषयाचे ऑनलाईन प्रशिक्षण पूर्ण केले. सर्व शिक्षकांचे मूल्यांकनही करण्यात आले आहे. हे शिक्षक सीबीएसई शाळांमध्ये MSFC अभ्यासक्रम शिकवण्यासाठी प्रशिक्षित झाले आहेत. सीबीएसईने शाळांमध्ये मल्टी स्किल विषय सुरू करण्याची प्रक्रिया देखील अत्यंत सोपी आणि सुलभ केली आहे.

- **इंटर्नशिप**

इयत्ता अकरावी आणि बारावीमध्ये कौशल्य अभ्यासक्रम शिकणाऱ्या ३००४ विद्यार्थ्यांनी इंटर्नशिप पूर्ण केली. मागील महिनाभरात जिल्हानिहाय इंटर्नशिप प्रमाणपत्र वितरण आणि विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या ऑनलाईन कार्यक्रमांमध्ये सचिव, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, समग्र शिक्षा अधिकाऱ्यांसह इतर अनेक मान्यवरांनी कार्यक्रमास उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

- **कोविड जागरूकता व मासिकपाळी दरम्यान स्वच्छता अभियान**

'हेल्थकेअर कोर्स' अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या इंटर्नशिप अंतर्गत सामुदायिक जाणीव जागृती करणारे दोन उपक्रम हाती घेतले होते. यामध्ये 'कोविड मधील सुरक्षिततेसंबंधी योग्य/समर्पक वर्तन' आणि 'मासिकपाळी स्वच्छते बाबतीतील जागरूकता' या दोन विषयांतर्गत ९६७ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात भाग घेतला आणि ३२६२ लोकांपर्यंत या उपक्रमाची माहिती पोहचवली.

- **हुन्नर गुरुकुल**

लेंड अ हँड इंडियाच्या सहकार्याने 'कॉज टू कनेक्ट'(Cause to Connect) या सामाजिक संस्थेत ४ जुलै रोजी 'हुनर गुरुकुल' शैक्षणिक कॅम्पस उभारणीसाठी भूमीपुजन कार्यक्रम झाला. हा कॅम्पस पुण्यापासून ३० किलोमीटरवर सासवड परिसरात उभा राहतो आहे. या गुरुकुल मध्ये 'सुतारकाम' आणि 'पर्यावरण पूरक बांधकाम तंत्र' असे दोन वर्षभर चालणारे अभ्यासक्रम ३ वर्षापूर्वी सुरु करण्यात आले. या कोर्स मध्ये मल्टी स्कील कोर्स पूर्ण केलेले विद्यार्थ्यांसुद्धा प्रवेश घेतात तसेच मागिल दोन वर्षात कोर्स पूर्ण केलेले अनेक विद्यार्थी स्वत:चा व्यवसाय सुरु करण्याच्या प्रकियेत आहेत.

- **Vocational Education Efficacy Enhancement - pilot project**

विद्यार्थ्यांची व्यावसायिक शिक्षण उपयोगिता व परिणामकारकता वाढवण्यासाठी कौशल्य शिक्षण शिकवणाऱ्या प्रशिक्षकांसाठी एक वर्ष कालावधीचा प्रशिक्षण उपक्रम लेंड अ हँड इंडियाने जुलै महिन्यात सुरु केला. पुणे व नाशिक जिल्ह्यातील शासकीय व अनुदानित शाळामधील ४० कौशल्य प्रशिक्षक यात सभागी आहेत. विद्यार्थ्यांना नोकरी व व्यवसाय जगाची ओळख, व्यवसायिक संधींची माहिती, व त्या अनुषंगाने व्यवसायिक शिक्षणाचे फायदे, व त्याच बरोबर किशोरवयीन विद्यार्थ्यांचे भावनिक व्यवस्थापन असे या अभ्यासक्रमाचे स्वरूप असणार आहे.

# ‘कारीगर’ - कौशल्य प्रशिक्षण केंद्र: भाग तीन
# ओळख इलेक्ट्रिकल लॅबची

Lend A Hand India

**मागील** दोन लेखात आपण ‘कारीगर’ प्रशिक्षण केंद्राची उद्दिष्टे आणि हे केंद्र सुरु करण्यामागचा उद्देश आपण पहिला. या पुढील लेखात ‘कारीगर’ प्रशिक्षण केंद्रामध्ये उपलब्ध असलेल्या विविध कौशल्य अभ्यासक्रमांच्या मॉडेल कार्यशाळा/ लॅब ची ओळख आपण करून घेणार आहोत. या अंकात आपण ‘इलेक्ट्रीकल’ विषयाच्या लॅबचे मॉडेल पाहूयात.

इलेक्ट्रीकल लॅब हि दोन भागांमध्ये विभागलेली आहे. यापैकी एका विभागात घरगुती विद्युत उपकरणाची दुरुस्ती आणि दुसऱ्या विभागात घरगुती वायरिंग कशा प्रकारे केली जाते आणि त्याच्या विविध पद्धती यांचा समावेश आहे.



**विद्युत उपकरण दुरुस्ती विभाग**




**घरगुती वायरिंग विभाग**


या दोन्ही विभागात प्रशिक्षणार्थीना प्रात्यक्षिक समजण्यासाठी भिंतींवर डेमो/सिमुलेटर बसवलेले आहेत. प्रत्येक उपकरण हे चागल्या पद्धतीने व सहज सर्किट डायग्रामद्वारे समजण्यासाठी हे सिमुलेटर बनवले आहेत आणि हे सर्व सिमुलेटर आपण चालू करून त्याची कार्यप्रणाली कशी चालते हे बघू शकतो. प्रशिक्षणार्थी स्वतः अथवा समूहामध्ये प्रात्यक्षिक करत असताना प्रत्येक उपकरणा मधील छोटे मोठे पार्ट, स्विचेस चेक करू शकता आणि त्यांचे कार्य काय आहे हे सहज समजावून घेऊ शकता.

घरगुती विद्युत उपकरणाच्या दुरुस्ती विभागामध्ये वेगवेगळया प्रकारचे घरगुती उपकरणे दुरुस्ती करण्याचे शिकवले जाते. त्यामध्ये इलेक्ट्रिक आयर्न, इलेक्ट्रिक गिजर, सॅंडविच मेकर, वॉटर हिटर, इलेक्ट्रिक केटल, सिलिंग फॅन, टेबल फॅन, इलेक्ट्रिक मिक्सर, इलेक्ट्रिक मोटर, मायक्रोव्हेव ओवन इत्यादीचा समावेश होतो.

घरगुती उपकरण दुरुस्ती अभ्यासक्रमामध्ये वेगवेगळया प्रकारच्या लेवल(basic, advanced etc.)चे मॉड्यूल तयार केले आहेत. प्रशिक्षणाला येणारे प्रशिक्षणार्थी आपल्या आवडीनुसार लेवल निवडू शकतात. **उर्वरित पान क्रमांक आठ वर ...**




**सिमुलेटर: मिक्सर आणि सँडविच मेकर**




**सिमुलेटर: वॉटर फिल्टर**


पान क्रमांक सात वरून पुढे ..

त्याचप्रमाणे दुसऱ्या घरगुती वायरिंग विभागात देखील अशाच प्रकारे प्रात्यक्षिक करण्यासाठी तयार प्लॉटफोर्म करण्यात आले आहेत जेणेकरून प्रशिक्षणार्थी वेगवेळया प्रकारची वायरिंग करायला शिकू शकतात. यामध्ये घरातील वायरिंग व स्वीच बोर्ड फिटिंग, मुख्य लाईट मीटर फिटिंग इत्यादी शिकविले जाते. या दोन अभ्यासक्रमांव्यतिरिक्त य अत्याधुनिक सोयी सुविधा असलेल्या लॅब मध्ये लेंड अ हॅंड इंडियाच्या अंतर्गत ज्या शाळांमध्ये मल्टी स्कील हा विषय शिकवला जातो त्या शाळांच्या शिक्षकांचे प्रशिक्षण देखील या ठीकाणी घेतले जाते. अनेक विद्यार्थ्यांनी आणि प्रशिक्षणार्थीनी या प्रशिक्षण केंद्रात अभ्यासक्रम पूर्ण करून त्यांच्या पुढील करीअरला सुरुवात केली आहे.

## जागतिक युवा कौशल्य दिनाची आणखी काही क्षणचित्रे




जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी घरी बनविलेल्या आकर्षक वस्तू आणि चित्रे




जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी आयोजित तज्ञांचे मार्गदर्शन

**लेंड अ हॅंड इंडिया**

9 , जीवन विहार हौसिंग सोसायटी ,
प्राईड पॅनोरमा जवळ, ऑफ सेनापती बापट मार्ग,
४११०१६ , फोन : (०२०) २५६३ ००९२.
Lahi@lend-a-hand-india.org , www.lend-a-hand-india.org

Lend A Hand India